इरादा पत्र

क्र.शिउसं/नावि/प्राथ-२/स्वअसशा/नवीन/२०१६ 15210/62
विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,
नाशिक विभाग,नाशिक
दिनांक- -७-२०१६ 01/08/2016

प्रति,
मा.अध्यक्ष / सचिव,
श्रीमती प्रतापसेठ चॅरीटेबल फाऊंडेशन प्रताप मि कॅम्पाऊंड अमळनेर,
जि. जळगांव ४२५४०१

विषय- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत सन २०१६-१७

संदर्भ- १) महाराष्ट्र स्वंय अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२

२) शासन निर्णय क्रमांक एसएफएस-१०१६/प्र.क.६९/एसएम-२/ मुंबई-३२ दिनांक १७ जून २०१६

उपरोक्त विषयी संदर्भ शासन निर्णयानुसार आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून नवीन शाळा सुरु करण्यास शासन परवानगी मिळण्यासाठी प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक ०२ च्या शासन निर्णयातील अ.क्र.८३० नुसार आपणास खालील प्रमाणे नवीन शाळा सुरु करण्यास शासन परवानगी देण्यात आलेली आहे.

| अ.क. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नांव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | मंडळ संलग्नता | मान्यतास्तर | मान्यता वर्षे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ८३० | जळगांव | श्रीमती प्रतापसेठ चॅरीटेबल फाऊंडेशन प्रताप मि कॅम्पाऊंड अमळनेर, जि. जळगांव ४२५४०१ | स्वामी विवेकानंद इन्टरनॅशनल स्कुल प्रताप मिल कम्पाउंड अमळनेर, जि. जळगांव | इंग्रजी | सि.बी.एस.ई. | प्राथमिक ते उच्च प्राथमिक (इयत्ता १ ली ते ८ वी) | २०१६-१७ |

अटी व शर्ती -

१) संदर्भ दोनचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्यांचा संकेतात २०१६०६१७१७१८५०९४२१ असा आहे.

२) आपण प्रस्तुत ठिकाणी सुरु करणार असलेल्या नवीन शाळेच्या संदर्भात प्रस्तुत शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२ च्या २.१ ते २.७ मधील सर्व तरतुदीचे / अटी व शर्तीचे पालन करणे आपणावर बंधन कारक राहील.

३) या अटीनुसार शाळेतील आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करुन देऊन आपण प्रस्तावित शाळा सुरु केल्यास,सुरु केले वर्ग/ वर्गवार दाखल झालेले विद्यार्थी यादी/ उपलब्ध केलेल्या भौतिक सुविधांच्या पुराव्यांसह शाळा सुरु केल्याची सविस्तर माहिती आपल्या जिल्हयाच्या संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांना एक महिन्याच्या आत लेखी कळवावी व शाळेची सर्वागीण तपासणी करण्यासाठी प्रस्ताव सादर करुन विहित पध्दतीचा अवलंब करुन समक्ष प्राधिकाऱ्याकडून प्रथम मान्यता प्राप्त करवून घ्यावी.

४) आपण या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्यांच्या आत प्रस्तुत शाळा सुरु केल्याचे न कळवल्यास आपल्या शाळेस शासनाने दिलेली ही परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

Principal
Swami Vivekananda International
School,Amalner Dist. Jalgaon

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक
नाशिक विभाग,नाशिक.

Manager
Swami Vivekananda
International School,Amalner

प्रत - माहिती व पुढील कार्यवाहीस्तव
शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद जळगांव यांना देऊन सुचित करण्यात येते की,

अ) प्रस्तुत प्राथमिक शाळेकडून संदर्भ २ च्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्तीची पूर्तता होत असल्याची खात्री करुन शाळेच्या प्रथम वर्गास/ यथास्थितीत एकाच वेळी सर्व वर्ग सुरु केले असल्यास त्या प्रमाणे अस्तित्वात असलेल्या सर्व प्रचलित नियमांच्या व पध्दतीच्या अधिनतेने प्रथम मान्यता देण्याची कार्यवाही करुन पुढील वर्गाना नैसर्गिक वाढीने मान्यता देण्याची कार्यवाही आपल्या स्तरावरुन करावी **अथवा** आपणास अधिकार नसलेल्या प्रकरणात वरिष्ठ कार्यालयाकडे प्रस्तावित करावी. तसेच इतर सर्व अनुषंगीक बाबींसदर्भात पुढील यथोचित कार्यवाही करुन त्याबाबतची प्रत या कार्यालयास अवगत करावी.

**ही मान्यता देण्यापूर्वी संस्थेने शिक्षणाधिकारी यांच्यासह संयुक्त नावाने विहित रकमेची व मुदतीची मुदत ठेव ठेवल्याची खात्री पटवून घ्यावी.**

***ब)शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, जळगांव यांनी प्रस्तुत शाळेत सद्यस्थितीत/ यथास्थिती भविष्यात इ.९ वी चा वर्ग प्रत्यक्ष सुरु करण्यात आल्यावर तपासणी करुन माध्यमिक स्तराच्या अंतिम परवानगीचा, त्या नंतर प्रथम मान्यतेचा आणि मंडळ मान्यतेचा इत्यादी संदर्भात यथास्थिती यथोचित प्रस्ताव सक्षम प्राधिकाऱ्यांकडे वेळोवेळी सादर करावेत.